Maharashtra State Board
of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर-४१६००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/डी.पी./फेब्रु.-मार्च २६/CCTV/ 750
दिनांक - 18 FEB 2026

प्रति,

सर्व केंद्र शाळा मुख्याध्यापक / प्राचार्य / केंद्रसंचालक,
सर्व इ.१०वी व इ.१२वी परीक्षा केंद्रे,
सातारा, सांगली व कोल्हापूर

**विषय :- परीक्षा केंद्रावरील CCTV कॅमेऱ्यांचे रेकॉर्डिंग जतन करुन ठेवणेबाबत..**

**संदर्भ :** १. राज्यमंडळ,पुणे यांचे क्र.रा.मं.परीक्षा-८/३२६९ दि.२५.०९.२०२५ चे पत्र.
२. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.कोविमं/ भौ.सु./ ३४०१ दि.२९.०९.२०२५
३. या कार्यालयाचे पत्र जा.क्र.कोविमं/डीपी/CCTV/४१०७ दि.२१.११.२०२५
४. शासन पत्र क्रमांक:- परीक्षा-१६२५/प्र.क्र.१३/एसडी-२ दि. ०३ डिसेंबर, २०२५
५. शासन निर्णय क्र.परीक्षा १६२५/ प्र.क्र.२२१/एस.डी.२ दि.०९.०१.२०२६
६. राज्यमंडळ, पुणे यांचे पत्र जा.क्र.रा.मं./परीक्षा-५/७०६ दि.१७.०२.२०२६

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये परीक्षा प्रक्रियेमध्ये पारदर्शकता, शिस्त व गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांमध्ये CCTV यंत्रणा कार्यान्वित ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. याबाबत केंद्रसंचालक बैठकीमध्ये सविस्तर सूचना दिलेल्या आहेत. उच्च माध्यमिक (इ. १२ वी) प्रमाणपत्र परीक्षा दिनांक १० फेब्रुवारी, २०२६ ते दिनांक १८ मार्च, २०२६ तसेच माध्यमिक शालान्त (इ. १० वी) प्रमाणपत्र परीक्षा दिनांक २० फेब्रुवारी, २०२६ ते दिनांक १८ मार्च, २०२६ या कालावधीत होत आहेत. परीक्षा केंद्र परीसरातील व परीक्षेशी संबंधित वर्गखोल्या तसेच माहिती तंत्रज्ञान(IT) / सामान्यज्ञान(GK) विषयांच्या ऑनलाईन परीक्षेदरम्यान संगणक प्रयोगशाळेतील CCTV कॅमेऱ्यांचे फुटेज जतन करुन ठेवणे अनिवार्य असून त्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी व सूचनांनुसार आवश्यक कार्यवाही करावी.

**रेकॉर्डिंग व संचयन (Storage) व्यवस्था :**

- परीक्षा सुरू होण्यापूर्वी परीक्षा कक्षातील कॅमेऱ्यांचे किमान ३० मिनिटे व परीक्षा संपल्यानंतर (दिव्यांग विद्यार्थी असलेस त्या कालावधीचा विचार करुन) रेकॉर्डिंग सुरू ठेवणे बंधनकारक राहील. परीक्षा केंद्रावरील DVR/ NVR मधील प्रत्येक पेपर दिवशीचे रेकॉर्डींग स्वतंत्र पेनड्राईव्ह / संगणकावर जतन करुन ठेवावे, फुटेज साईज (Data) अधिक असल्यास हार्डडिस्कमध्ये ते जतन करुन ठेवावे. रेकॉर्डींग जतन करत असताना आयटी शिक्षक किंवा तंत्रस्नेही शिक्षकाची मदत घ्यावी.
- सर्व कॅमेरे सतत Continuous Recording Mode वर ठेवावेत. Motion Recording टाळावे.

- DVR/NVR मध्ये पुरेशी हार्डडिस्क क्षमता किमान १ TB किंवा आवश्यकतेनुसार अधिक असावी. क्षमता कमी असल्यास DATA वगळला जाण्यापुर्वीच वेळोवळी Hard Disk किंवा संगणकामध्ये त्या दिवसापर्यंतचा डाटा साठवून घ्यावा.
- केंद्रावरील सर्व पेपरच्या दिवशीचे रेकॉडिंग पेनड्राईव्ह अथवा संगणकावर, तसेच आवश्यकतेनुसार हार्डडिस्कमध्ये पुढील आदेशापर्यंत जतन करुन ठेवावे. विभागीय मंडळ अथवा जिल्हा दक्षता समितीने मागणी केल्यास तात्काळ उपलब्ध करुन द्यावे.
- आवश्यकतेनुसार बॅकअप External Hard Disk / Cloud Storage ठेवणे बंधनकारक राहील.
- परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्रावरील CCTV चे live access जिल्हा दक्षता समिती / वरिष्ठ कार्यालय तसेच मंडळाने मागणी केल्यास परीक्षा केंद्रांनी ते उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे.
- दररोज पेपर सुरु होण्यापुर्वी आणि वेळोवेळी सर्व CCTV कॅमेरे सुरु आहेत याबाबत केंद्रसंचालकांनी खात्री करावी.
- परीक्षा केंद्रास भेट देणाऱ्या अधिकारी, भरारी पथक, बैठे पथक यांना CCTV कॅमेरे व यंत्रणा कार्यान्वित असल्याबाबत केंद्रसंचालकांनी अवगत करावे.
- परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्र परिसर व वर्गखोल्यांमधील CCTV कॅमेरे बंद असणे, बंद ठेवणे, access उपलब्ध करुन न देणे, फुटेज न ठेवणे अथवा उपलब्ध करुन न देणे या बाबी गैरप्रकार करण्याच्या उद्देशाने केल्याचे मानण्यात येईल. याबाबत संबंधित केंद्राचे प्राचार्य, केंद्रसंचालक, केंद्रसमन्वयक यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन गैरमार्ग प्रतिबंध अधिनियम १९८२ अंतर्गत गैरप्रकार करणे, गैरप्रकारास मदत करणे आणि उत्तेजन देणे या कलम क्र. ०३ अन्वये कारवाई करण्यात येईल.

वरील सर्व सूचनांचे काटेकोर पालन करणे ही परीक्षा केंद्रसंचालकांची व संबंधित परीक्षा केंद्र शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक / प्राचार्य व केंद्र समन्वयक यांची वैयक्तिक जबाबदारी राहील. कोणतीही त्रुटी आढळल्यास संबंधितांविरुद्ध नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

वरील सूचनांची तात्काळ अंमलबजावणी करावी.

(सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत -

१. शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, सातारा, सांगली व कोल्हापूर
२. भरारी पथक / बैठे पथक - विभागीय / जिल्हास्तर- सातारा, सांगली व कोल्हापूर - केंद्रभेटीत CCTV यंत्रणा कार्यान्वित असल्याची खात्री Screen वर करावी, नसल्यास त्याबाबत केंद्रसंचालकांना सूचना द्यावी. तसा अहवाल शिक्षणाधिकारी (माध्य.) यांना द्यावा.
३. परिरक्षक (सर्व) - फेब्रुवारी-मार्च २०२६ - उपरोक्त सूचनांनुसार आवश्यक पाठपुरावा करावा.

## परीक्षा केंद्रामध्ये CCTV वापराबाबत तांत्रिक व प्रशासकीय सर्वसाधारण सूचना

**१) CCTV कॅमेऱ्यांच्या तांत्रिक बाबी :**

- कमी प्रकाशात (Low Light) देखील स्पष्ट रेकॉर्डिंग होईल अशी प्रकाशव्यवस्था असावी.
- प्रत्येक कॅमेऱ्यामध्ये दिनांक व वेळ (Date & Time Stamp) अचूकपणे सेट असणे आवश्यक आहे.

**२) कॅमेरे बसविण्याची पद्धत :**

- प्रत्येक परीक्षा कक्षामध्ये संपूर्ण वर्ग स्पष्ट दिसेल अशा पद्धतीने किमान १ किंवा आवश्यकतेनुसार अधिक कॅमेरे असावेत.
- परीक्षा केंद्रसंचालक कक्ष, प्रवेशव्दार, कॉरिडॉर, परीक्षेसाठी आवश्यक वर्गखोल्या व नियंत्रण कक्ष येथे कॅमेरे आवश्यक आहेत.
- कॅमेरे अशा उंचीवर बसवावेत की त्यामध्ये छेडछाड होणार नाही.

**३) वीजपुरवठा व नेटवर्क सुविधा :**

- CCTV प्रणाली UPS / इन्व्हर्टरशी जोडलेली असावी.
- वीजपुरवठा खंडित झाल्यास किमान २ तास रेकॉर्डिंग सुरू राहील अशी व्यवस्था असावी.
- नेटवर्क आधारित प्रणाली असल्यास इंटरनेट कनेक्शन स्थिर व सुरक्षित असावे.
- LAN केबलिंग व्यवस्थित व सुरक्षित पद्धतीने करण्यात यावे.

**४) नियंत्रण व देखरेख :**

- परीक्षा सुरू होण्यापूर्वी सर्व कॅमेरे कार्यरत असल्याची खात्री केंद्रसंचालकांनी करावी.
- नियंत्रण कक्षात मॉनिटरद्वारे थेट निरीक्षणाची सुविधा उपलब्ध असावी.
- CCTV फुटेजमध्ये कोणतीही छेडछाड होऊ नये याची संपूर्ण जबाबदारी केंद्रसंचालकांची राहील.
- जिल्हास्तर दक्षता समिती / संबंधित अधिकारी / मंडळाने मागणी केल्यास आवश्यक फुटेज त्वरित उपलब्ध करून द्यावे.

**५) सुरक्षितता व गोपनीयता :**

- रेकॉर्डिंगमध्ये प्रवेश केवळ अधिकृत व्यक्तींनाच असावा.
- DVR/NVR प्रणाली पासवर्ड संरक्षित असावी.
- प्रणालीमध्ये अनधिकृत प्रवेश रोखण्यासाठी आवश्यक सायबर सुरक्षा उपाययोजना कराव्यात.